Literacy for a Billion

Movie: Pudhach Paool
Year: 1986

Song: Jo To Aapapla Yethe
Lyricist: Sudhir Moghe

जोतो आपापला येथे
कुणी ना आधार
जो तो आपापला येथे
कुणी ना आधार
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर
जो तो आपापला येथे
कुणी ना आधार
जो तो आपापला येथे
कुणी ना आधार
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर

देह आंधळी कोठडी
बंदीवान झाले श्वास
देह आंधळी कोठडी
बंदीवान झाले श्वास
इथे कुणी कोणाची का
उगा धरायाची आस
इथे कुणी कोणाची का
उगा धरायाची आस
वाटा वेगळ्या या वेड्या
वेगळ्या जाणार
वाटा वेगळ्या या वेड्या
वेगळ्या जाणार

मनाचिया घावा वरी
मनाची फुंकर
मनाचिया घावा वरी
मनाची फुंकर
मानभंग आदि व्याधी
नाना व्याप ताप
कुणी किती सोसायाचे
नाही मोजमाप
मानभंग आदि व्याधी
नाना व्याप ताप
कुणी किती सोसायाचे
नाही मोजमाप
सुखे एकरंगी
दुःखे अनंत अपार
सुखे एकरंगी
दुःखे अनंत अपार
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर

अधांतरी विश्वाचाही
संसार पोरका
ज्याने रचियेला त्याला
देई आर्त हाका
अधांतरी विश्वाचाही
संसार पोरका
ज्याने रचियेला त्याला
देई आर्त हाका

Literacy for a Billion

देई आर्त हाका
तोच बुडवितो तोच तारूनी नेणार
तोच बुडवितो तोच तारूनी नेणार
मनाचिया घावा वरी
मनाची फुंकर
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर
जोतो आपापला येथे

कुणीना आधार
जोतो आपापला येथे
कुणीना आधार
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर
मनाचिया घावावरी
मनाची फुंकर

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*